१

[ ग्याझिट पान १५, ता० १२।७।१९. ]

# कोल्हापूर इलाख्यांतील विवाहासंबंधीं कायदा.

कोल्हापूर इलाख्यांतील विवाहासंबंधीं कायदा.

ज्यापेक्षां हिंदु आणि जैन यांच्यांत हल्लीं असंख्य जाति निर्माण झाल्या आहेत आणि भिन्न जातीच्या लोकांत विवाह होण्यास रूढीचा प्रतिबंध येतो, तथापि हिंदु आणि जैन यांच्यामध्यें असे विवाह प्राचीन काळीं सर्वसाधारणपणें प्रचारांत होते; आणि ज्यापेक्षां कोणाही जैनास अगर हिंदूस जातिनिर्बंध न पाळतां सदरहू दोहोंपैकीं आपआपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशीं विवाह करण्याची मुभा असणें इष्ट आहे; आणि ज्यापेक्षां त्याच्याकरितां विवाहाचा एक प्रकार ठरवून देणें—तसेंच ज्याचे कायदेशीरपणासंबंधानें शंका आहे असले कांहीं विवाह कायदेशीर ठरविणें योग्य आहे; त्यापेक्षां यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे.

स्थानिक व्याप्ति.

१. हे नियम सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहेत.

व्याख्या.

२. हिंदूमध्यें आर्यसमाजिष्टांचा समावेश होतो.

विवाह कोणत्या शर्तींवर करणेचे.

३. या नियमांतील ठरावाअन्वयें ज्यांस विवाह करणेचे असतील, त्यांनीं खालीं लिहिलेल्या शर्ती पाळल्या पाहिजेत.

१. विवाहाचे वेळीं नवरीमुलीचा नवरा हयात असतां कामा नये.

२. पुरुषाचें वय ग्रेगोरिअन् कॅलेंडरप्रमाणें पूर्ण १८ वर्षांचें व स्त्रीचें १४ वर्षांचें होऊन गेलें असलें पाहिजे.

३. नवरीमुलीचें वय पूर्ण १८ वर्षांचें झालें नसेल तर तिनें आपला बाप अगर पालन करणारा यांची संमति विवाहास मिळविली असली पाहिजे.

४. कोणत्याही कायद्यावरून त्याचें लग्न गैरकायदेशीर ठरण्यासारखा त्याचा नात्याचा अगर रक्ताचा परस्परसंबंध असतां कामा नये.

मात्र

१. नातें अगर रक्तसंबंध यासंबंधीं कायदा अगर रूढी याशिवाय अन्य कोणच्याही कायद्यावरून अगर वहिवाटीवरून त्यांना लग्न करण्यास प्रतिबंध येणार नाहीं.

२. रक्तसंबंधाच्या कोणत्याही कायद्यावरून अगर वहिवाटीवरून त्याचे लग्नास प्रतिबंध येणार नाहीं; पण त्याच्यामध्यें एका मूळपुरुषापासून निपणजाचे अगर निपणजींपेक्षां अधिक जवळचे नात्याचा संबंध येत असेल असें नातें असतां कामा नये अगर एकजण दुसऱ्याचा सरळ मूळपुरुष अगर सरळ मूळपुरुषाचा भाऊ अगर बहीण असतां कामा नये.

४. या नियमाअन्वयें स्थानिक सरकारांनीं एक अगर अनेक विवाह नोंदणाराची नेमणूक नांवानें अगर हुद्याच्या नात्यानें त्यांच्या अमलाखालीं येणाऱ्या प्रदेशापुर्ती करावी. यामप्रमाणें नेमलेल्या कामास "सन १९१८ चे विशेष विवाहाचे नियमाप्रमाणें विवाहाचे नोंदणारे" ह्मटलें जाईल आणि त्यास यापुढें येथें नोंदणारे एवढेंच ह्मटलें आहे. याप्रमाणें जेवढ्या प्रदेशापुर्ती अशा

विवाह नोंदणारांची नेमणूक.

कामगाराची नेमणूक करण्यांत येईल त्या प्रदेशास त्याचा डिस्ट्रिक्ट असें मानण्यांत येईल.

कोणी तरी एक पक्षानें नोंदणारास नोटीस देणें.

५. या नियमाअन्वयें विवाह करून घेण्याचा बेत असेल तेव्हां एक पक्षानें ज्या नोंदणाऱ्यासमोर तो विवाह होणार असेल, त्या नोंदणारास लेखी नोटीस दिली पाहिजे.

अशी नोटीस ज्या नोंदणारास दिली असेल त्याचे डिस्ट्रिक्टांत विवाहांतील निदान कोणचा तरी एक पक्ष नोटीस देणेंपूर्वी १४ दिवसपर्यंत राहाणारा असला पाहिजे.

ही नोटीस या नियमाचे प्रथम परिशिष्टांत नमुना दिल्याप्रमाणें देतां येईल.

नोटीस फैल करून नक्कल नोटीस बुकास दाखल करणें.

६. नोंदणारानें या सर्व नोटिसा फाईल करून आपल्या दप्तरचे कागदपत्रासोबत ठेविल्या पाहिजेत; आणि "विवाह नोटीस बूक" ह्मणून त्यास सरकारांतून मिळेल त्या बुकास त्यांची खरी नक्कल दाखल केली पाहिजे. हें बूक सर्व योग्य वेळीं सर्व लोकांस फीसिवाय पहाण्याची मोकळीक राहील.

विवाहास हरकत.

७ चवथ्या नियमाप्रमाणें योजिलेल्या विवाहाची नोटीस दिल्यानंतर १४ दिवसांनीं तो विवाह करण्यास हरकत नाहीं. मात्र त्यास खालीं लिहिल्याप्रमाणें हरकत आली नसली पाहिजे. अशा विवाहास नियम २ यांतील रकम १-२-३-४ यांत सांगितलेल्या एक अगर अनेक शर्तीची हरकत येते, अशाविषयीं कोणाहि मनुष्यास हरकत कळवितां येईल.

नोंदणारानें सदरप्रमाणें कळविलेल्या हरकतीचें स्वरूप नोंदबुकांत नोंदलें पाहिजे; आणि जरूर तर तें हरकत कळविणारास वाचून

दाखवून समजावून दिलें पाहिजे; आणि त्यावर त्यानें अगर त्याजकरितां ह्मणून दुसऱ्यानें सही केली पाहिजे.

हरकत आलेनंतर काम चलविणेची रीति.

८. याप्रमाणें हरकतीची नोटीस आलेनंतर नोटीस आलेपासून १४ दिवस होऊन जाईपर्यंत जर त्यावेळीं योग्य अधिकार असणारें कोर्ट उघडें असेल तर नोंदणारानें विवाह लावूं नये. किंवा जर असें कोर्ट त्यावेळीं उघडें नसेल तर तें उघडें झाल्यानंतर १४ दिवस होऊन जाईपर्यंत नोंदणारानें तो विवाह लावूं नये.

हरकतदारास दावा लावणेचा अखत्यार आहे.

९. होणारे विवाहास हरकत कळविणारे इसमास तो विवाह नियम २ यांतील रकम १-२-३ अगर ४ यांत सांगितल्यापैकीं एक अगर अनेक शर्तींच्या विरुद्ध होईल असें ठरवून मिळण्याकरितां (लहान दाव्याचें कोर्ट नव्हे अशा) स्थानिक अधिकार असणारे कोणच्याहि दिवाणी कोर्टांत दावा दाखल करण्याचा अखत्यार आहे.

दावा दाखल केल्याचें सर्टीफिकीट नोंदणाराचे हवाली करणेचें.

१०. असा दावा ज्या कामगारासमोर दाखल झाला असेल त्या कामगारानें तसा दावा दाखल झाल्याबद्दल दावा दाखल करणार इसमास दाखला दिला पाहिजे; आणि वेळीं योग्य अधिकार असणारें कोर्ट उघडें असेल तर हरकतीची नोटीस आल्यापासून चौदा दिवसांचे आंत जर असा दाखला नोंदणाराचे हवालीं करण्यांत येईल; तर त्या कोर्टाकडून निकाल होईपर्यंत आणि त्या निकालावर कायद्यानें अपील ठेविलें असेल त्या अपिलाची मुदत खलास होईपर्यंत अगर अपील झालें असल्यास अपील कोर्टाकडून निकाल होईपर्यंत तो विवाह लावण्यांत येऊं नये.

मागील पारिग्राफांत सांगितल्याप्रमाणें त्या रीतीनें व त्या मुदतींत जर तसा दाखला हवालीं केला नसेल अगर जर कोर्टाचा निकाल

असा होईल कीं, अशा विवाहामुळें नियम २ यांतील रकम १।२।३।४ यांत सांगितल्याप्रमाणें एक अगर अनेक शर्तींचें उल्लंघन होत नाहीं तर तो विवाह लावण्यास हरकत नाहीं. जर कोर्टाचा निकाल असा होईल कीं, त्या विवाहामुळें नियम २ रकम १।२।३ अगर ४ यांतील एक अगर अनेक शर्तींचें उल्लंघन होत आहे तर तो विवाह लावितां कामा नये.

हरकत सयुक्तिक नसेल तेव्हां कोर्टास दंड करण्याचा अखत्यार.

११. नियम ७ यांत सांगितल्याप्रमाणें ज्या कोर्टांत तसा दावा दाखल करण्यांत आला असेल त्या कोर्टास जर असें दिसून येईल कीं, कळविलेली हरकत सयुक्तिक आणि इमानें इतबारें समजुतीची नाहीं तर हरकत कळविणारे इसमास एक हजार रुपयांहून अधिक नाहीं इतका दंड करण्याचा व तो अगर त्याचा कोणचाही अंश त्या विवाहाच्या पक्षास देण्याचा त्या कोर्टास अखत्यार आहे.

उभयपक्ष व साक्षीदार यांचा इकरार.

१२. याप्रमाणें विवाह लावण्यापूर्वी उभयपक्ष आणि तीन साक्षीदार यांनीं नोंदणाराचे समक्ष या नियमाच्या दुसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें इकरार करून त्यावर आपली सही करावी. वधूचे वयास जर अठरा वर्षें पुरीं झालीं नसतील तर विधवेचा प्रसंग खेरीजकरून सदरहू इकरारावर तिच्या बापाची अगर पालकाचीही सही झाली पाहिजे आणि प्रत्येक प्रसंगीं त्यावर नोंदणाराची मखलासी झाली पाहिजे.

विवाह लावणेची रीति.

१३. नोंदणारा व इकरारावर सही करणारे ३ साक्षीदार यांच्या समक्ष विवाह लावण्यांत आला पाहिजे. तो कोणच्याही पद्धतीनें लाविला तरी चालेल, मात्र प्रत्येक पक्षानें दुसऱ्या पक्षास नोंदणार व साक्षीदार यांच्या समक्ष व त्यांस ऐकूं जाईल अशा तऱ्हेनें "मी तुजला माझी माझा कायदेशीर बायको नवरा ह्मणून पत्करिलें आहे" याप्रमाणें अगर त्यांची जन्मभाषा असेल त्या भाषेंत सदरहू अर्थाचें वाक्य उच्चारिलें पाहिजे.

१४. विवाह लावणेचा तो पक्षांचे इच्छेनुरूप नोंदणाराचे कचेरींत लावावा अगर त्या कचेरीपासून बेतवार अंतरावर असणारे दुसरे एखादे जागीं लावावा. मात्र नोंदणाराचें ऑफीसखेरीज इतर ठिकाणीं विवाह लावणें झाल्यास त्याजबद्दलच्या शर्ती ठरविण्याचा व अधिक फी किती देण्याची ते ठरविण्याचा अधिकार स्थानिक सरकारास आहे.

विवाह लावणेची जागा.

१५. विवाह लावण्यांत आल्यानंतर त्याचा दाखला नोंदणारानें त्याकरितां ठेवण्यांत आलेल्या बुकांत या नियमाच्या तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें नोंदावा. या बुकास "सन १९१८ च्या लग्नसंबंधीं विशेष नियमाप्रमाणें होणाऱ्या विवाहाचें दाखले बूक" असें ह्मणावयाचें आहे. या दाखल्यावर विवाहाच्या उभयपक्षांच्या व तीनही साक्षीदारांच्या सह्या झाल्या पाहिजेत.

विवाहाचा दाखला.

१५. (अ) श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांजकडून हुकूम होईल त्याप्रमाणें त्या त्या मुदतींनीं वेळोवेळीं ठरविण्यांत येईल त्या नमुन्याप्रमाणें विवाहाच्या दाखलेबुकांतील नोंदींच्या नकला त्या खऱ्या असल्याचें दाखल्यासह गेल्या शेवटच्या मुदतीनंतरच्या नोंदणी करणार यानें दिवाण सरकार करवीर यांजकडे पाठविल्या पाहिजेत.

"विवाहाचें दाखलेबुकांतील नोंदीच्या दाखले नकला दिवाण यांजकडे पाठविणें.

१६. या नियमाप्रमाणें नोंदणारानें जीं कामें करण्याबद्दल सांगितलें आहे त्याबद्दल त्यास किती फी देणेची तें स्थानिक सरकार ठरवील.

फी.

सदरहू फीचें मागणें, नोंदणारानें त्यास योग्य वाटेल तर विवाह लावणेपूर्वीं किंवा ज्या कर्तव्याबद्दल फी मिळणें असेल तें कर्तव्य करण्याच्या पूर्वीं करण्यास हरकत नाहीं.

वर सांगितलेलें विवाहाचें दाखलेबुक कोणत्याही वेळीं पाहण्यास मिळण्याची मोकळीक राहील; आणि त्यांत असलेल्या मजकुराच्या खरे-पणाबद्दलचा पुरावा ह्मणून तें ग्राह्य करण्यांत येईल. त्यावरून दाखले उतारे मिळण्याबद्दल अर्ज आल्यास ते स्थानिक सरकार ठरवितील त्याप्रमाणें फी जमा झाल्यावर नोंदणी करणारानें तयार करून दिले पाहिजेत.

विवाहित स्त्रीनें या नियमाप्रमाणें पुनः विवाह केल्याबद्दल शिक्षा

१७. जी कोणतीही स्त्री त्या वेळीं विवाहित असून या नियमाप्रमाणें आणखी आपला विवाह लावून घेईल ती इं० पि० कोड कलम ४९४ अगर ४९५ प्रमाणें अपराधी समजण्यांत येईल; आणि असा लाविलेला विवाह रद्द आहे.

दोन लग्नांबद्दल शिक्षा.

१८. या नियमाप्रमाणें ज्या कोणत्याही स्त्रीचें लग्न झालें असून नवरा हयात असतांना दुसरें लग्न लावून घेईल ती अशा दुसऱ्या लग्नाचे वेळीं कोणत्याही धर्माची ह्मणून नवरा हयात असतां दुसरें लग्न लावून घेतल्याच्या अपराधाबद्दल इं० पि० कोड कलम ४९४–४९५ यांत सांगितलेल्या शिक्षेस पात्र होईल.

कोल्हापुरचा डायव्होर्स आक्ट लागू असणें.

१९. या नियमाअन्वयें झालेल्या सर्व विवाहास कोल्हापूरचे डायव्होर्स (विवाहबंधविनिमोचनचे) नियम लागू आहेत आणि असें कोणतेंही लग्न त्या नियमांत ठरविल्याप्रमाणें व त्यांत सांगितल्या कारणाकरितां अगर नियमाचें कलम २ रकम १।२।३ अगर ४ यांतील एक अगर अनेक शर्तीविरुद्ध झाल्या कारणानें रद्द अगर बंधनमुक्त ठरविण्यास हरकत नाहीं.

या नियमांतील लग्नाच्या प्रजेस कायदा लागू असणें.

२०. या नियमाअन्वयें झालेल्या विवाहापासून उत्पन्न झालेली प्रजा जर या नियमाअन्वयें विवाह करतील तर एकरक्तसंबंध व नात्याचा संबंध या कारणानें विवाहाच्या मनाईविषयीं जो कायदा त्याच्या बापास

लागू होता, तोच त्यांसही लागू राहून या नियमांतील कलम २ चे अपवाद लागू होतील.

२१. या नियमाप्रमाणें जे विवाह झाले नाहींत त्या विवाहाच्या कायमपणास या नियमांत कांहीं सांगितलें असलें तरी त्यावरून बाध येणार नाहीं. तसेंच विवाह ठरविण्याच्या पद्धतीच्या कायमपणासही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें या नियमावरून बाध येतो असें मानण्यांत येणार नाहीं. पण जर अशा पद्धतीच्या कायमपणासंबंधानें यानंतर केव्हां कोर्टासमोर प्रश्न उत्पन्न होईल तेव्हां त्या प्रश्नाचा निर्णय हे नियम झालेच नाहींत असें समजून केला पाहिजे.

या नियमाशिवाय इतर प्रकारें झालेल्या विवाहांचा बचाव.

२२. कोणत्या मनुष्यानें या नियमांत सांगितलेला कोणताही इकरार अगर दाखला खोट्या हकीकतीचा आणि तो खोटा असल्याचें त्यास माहीत आहे अगर तो खरा आहे असें मानीत नाहीं असा केला, त्याजवर सही केली अगर साक्ष घातली, तर त्यानें इं० पि० कोड कलम १९९ यांत सांगितलेला अपराध केला आहे असें मानण्यांत येईल.

खोट्या गोष्टी असलेल्या इकरारावर अगर दाखल्यावर सही केल्याबद्दल शिक्षा.

२३. श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांचे अमलाखालील मुलखांत चालू असलेल्या ज्या कोणच्याही कायद्यावरून "कोणा स्त्रीनें अगर पुरुषानें आपला धर्म राखून, पण आपल्या जातीशीं व्यवहार ठेवण्याचें सोडल्या कारणानें अगर तसा व्यवहार ठेवण्याचें मना केल्या कारणानें किंवा जातिबाह्य ठेविल्या कारणानें त्यांचा हक्कसंबंध अगर मालमत्ता सरकारजमा व्हावी लागत असेल किंवा कोणच्याही प्रकारें वारशाच्या हक्कास कमीपणा अगर बाध येत असेल; तितक्या अंशीं" तो कायदा कोल्हापूर इलाख्यांतील कोर्टांत कायद्याप्रमाणें चालू राहण्याचें बंद राहील.

वारसाचे हक्काविषयीं.

## परिशिष्ट पहिलें.

( नियम ४ था पहा )

## विवाहाची नोटीस.

सन १९१८ चे विवाहाचे विशेषनियमाप्रमाणें करवीर इलाख्याचे विवाहाचे नोंदणी करणार यांसः—

मी या लेखावरून तुह्मांस नोटीस देत आहे कीं, या नोटिशीचे तारखेपासून तीन कॅलेंडर महिन्याचे आंत १९१८ चे विवाहाचे विशेष-नियमाप्रमाणें मी व यांत नांव व वर्णन दाखल केलेला दुसरा पक्ष यांच्यामध्यें विवाह करण्याचा बेत आहे ह्मणजे :—

| नांवें. | स्थिति. | दर्जा अगर धंदा. | वय. | राहण्याचें ठिकाण. | राहिलेची मुदत. |
|---|---|---|---|---|---|
| अब. | अविवाहित. | जमीनवाला. | पूर्ववयाचा | .... .... | २३ दिवस. |
| | विवाहित. | | अल्पवयी. | | |
| कड. | विधुवा. | .... .... | .... .... | .... .... | .... .... |
| | अविवाहित वधू. | | | | |

याचे साक्षीकरितां आज ता० माहे सन इ० रोजीं स्वदस्तूरची सही केली आहे.

[ सही ) अ. ब.

## परिशिष्ट दुसरें.

(कलम १० पहा.)

वरानें इकरार करण्याचा तो.

मी अ. ब. या लेखावरून इकरार करितों कीं,

१ मी सध्यांच्या वेळीं विवाहित, अविवाहित अगर विधुर आहे.

२ मी विवाहाचे विशेष नियम १९१८ प्रमाणें विवाह करूं पाहतों.

३ मी हिंदू अगर जैन जातीचा आर्यसमाजवाला आहे.

४ माझे वयाला अठरा वर्षे पूर्ण झालीं आहेत.

५ ज्या कायद्यास मी पात्र आहे अगर क. ड. (नवरी) पात्र आहे त्या कायद्याप्रमाणें आणि १९१८ चे विवाहाचे विशेष नियमाचे कलम २ रकम ४ यांतील ठरावाप्रमाणें आमच्यामध्यें विवाह होणें गैरकायदेशीर होईल अशाप्रकारें एकरक्तसंबंध अगर नातें याच्या कोणच्याही डिग्रीचें माझें व क. ड. (नवरी) चें नातें नाहीं.

६ या इकरारांतील कोणतीही हकीकत खोटी असून ती सांगतांना खोटी असल्याचें मला माहीत असेल अगर तसें मी मानत असेन किंवा ती खरी असल्याचें मी मानत नसेन तर मजला कैद होण्यास व आणखी दंडही होण्यास मी पात्र आहे, हें मी जाणून आहे.

(सही) अ. ब. नवरा

## नवरीनें करून देण्याचा इकरारनामा.

मी क. ड. या लेखावरून इकरार करितें कीं,

१ मी सध्यांचे वेळीं अविवाहित अगर विधवा आहे, किंवा सोडचिठ्ठी मिळविली आहे.

२ मी १९१८ चे विवाहाचे विशेष नियमाप्रमाणें विवाह करूं इच्छितें.

३ मी जातीची हिंदू अगर जैन आहे, अगर आर्यसमाजपंथी आहे.

४ माझे वयास चवदा वर्षे पूर्ण झालीं आहेत.

५ ज्या कायद्यास मी अगर अ. ब. (नवरा) पात्र आहे, त्या कायद्याप्रमाणें अगर १९१८ चे विशेषनियमाचे कलम २ रकम ४ यांतील ठरावाप्रमाणें आह्मांमधील विवाह गैरकायदेशीर ठरेल अशाप्रकारें एकरक्तसंबंध अगर नातें यांच्या कोणत्याही डिग्रीचें अ. ब. याच्याशीं माझें नातें नाहीं.

(आणि विधवा नसल्यास नवरीचे वयास अठरा वर्षे पूर्ण झालीं नसतील तेव्हां)

६ म. न. माझा बाप (अगर पालन करणार जसें असेल तसें) यांची मी स्वतः आणि अ. ब. यांच्यामध्यें विवाह होण्याविषयीं कबुली झाली असून ती परत घेतलेली नाहीं.

७ या इकरारांतील कोणतीही हकीकत खोटी असून ती सांगतांना खोटी असल्याचें मला माहीत असेल अगर तसें मी मानत असेन किंवा ती खरी असल्याचें मी मानत नसेन तर मजला कैद होण्यास व आणखी दंडही होण्यास मी पात्र आहे, हें मी जाणून आहे.

(सही) क. ड. (नवरी)

वर नांवें लिहिलेलीं अ. ब. आणि क. ड. यांनीं आमच्या समक्ष सह्या केल्या आहेत.

ग. ह.<br>
य. ज. } (तिघे साक्षीदार.)<br>
क. ट.

(आणि नवरी विधवा नसेल तेव्हां तिचे वयास अठरा वर्षे पूर्ण
झालीं नसतील तर)

वर लिहिलेली क. ड. इनें माझ्या समक्ष व माझ्या कबुलीनें सही
केली आहे.

म. न. वर लिहिलेली क. ड. इचा बाप (मखलाशी अगर पालक
जसें असेल तसें.)

ई. फ.

१९१८ चे विशेष नियमाप्रमाणें करवीर इलाख्याचे विवाहाचे नोंदणार
ता. माहे सन

## परिशिष्ठ तिसरें.

(क. १३ पहा.)

## नोंदणाराचा दाखला.

मी ई. फ. दाखला देतों कीं, अ. ब. आणि क ड. हे ता.
माहे सन १९ इ. रोजीं माझेसमोर हजर राहिले
आणि या प्रत्येकांनीं माझ्यासमक्ष याखालीं सही करणारे तीन
विश्वसनीय साक्षीदार यांच्या समक्ष १९१८ चे विवाहाचे विशेष
नियमाप्रमाणें जरूर असणारा इकरारनामा केला असून सदरहू
नियमाप्रमाणें त्यांचा विवाह माझे समक्ष झाला आहे.

(सही) ई. फ.

करवीर इलाख्याचा नोंदणारा.

(सही) अ. ब.

क. ड.

ग ह.
य. ज. } तिघे साक्षीदार.
क. ळ.

तारीख माहे सन १९ इसवी.

## २

ग्याझेट पान २५ तारीख २-८-१९.

# कोल्हापुरच्या काडी मोडण्याच्या कायद्याचा हेतू व कारणें :-

कोल्हापुरच्या काडी मोडण्याच्या कायद्याचा हेतू व कारणें.

ज्यापेक्षां दरबारच्या हिंदू प्रजाजांच्या अनेक जातीमध्यें काडी मोडण्यासंबंधानें बरीच ढिलाई आहे, असें करवीर दरबाच्या नजरेस आलें आहे; आणि ज्यापेक्षां ही ढिलाई अशीच चालू ठेविल्यास समाज सर्वस्वी नीतिभ्रष्ट होईल; आणि विवाहविधी जो सुधारलेल्या समाजाच्या सर्व इमारतीचा पाया आहे, तो अजीबात नाहींसा होईल, असें दरबारचें मत आहे; त्यापेक्षां नवरा व बायको यामधील भौतिक हितसंबंध कायद्याच्या मध्यस्थीनेंच काडी मोडून घेण्याची त्यांस मुभा देऊन दृढतर पायावर उभारण्याचें योजिलें आहे. काडी मोडणें ही जातींतील पंचांच्या ठहरीवर सोडण्याची पडलेली चाल बंद करण्याचेंहि योजिलें आहे. ज्यांनीं काडी मोडून घेतली आहे, अशा इसमाचा विवाह अगर इसमांचे विवाह कायदेशीर करण्याचे अगर कायदेशीर करून घेण्याचे व काडी मोडण्यापूर्वी जन्मलेल्या मुलाच्या ताब्यासंबंधीं नियम करणेचें योजिलें आहे.

## काडी मोडून देण्यासंबंधीं नियम.

ज्यापेक्षां जे करवीर संस्थानांतील रहिवासी व प्रजाजन आहेत; व ज्यांना काडी मोडून घेण्याची इच्छा आहे, अशा सर्व जातींच्या आणि धर्माच्या लोकांना काडी मोडून घेण्याच्या बाबतींत कांहीं विवक्षित प्रसंगीं सहाय्य देणें आणि यापुढें दिलेल्या नियमांना जी कोणत्याहि तऱ्हेनें विरुद्ध असेल अशी कोल्हापूर संस्थानांतील कोणत्याहि जातीमध्यें प्रचलित असलेली चाल अगर रीत बेकायदा आहे, असें दर्शविणें योग्य आहे; आणि काडी मोडणें हें बायकांच्या मर्जीवर अवलंबून असल्यानें व त्या वर्तमानपत्रांतून नोटिसा देऊन काडी मोडून घेत असल्यानें काडी मोडण्याचा जो दुरुपयोग होतो, त्यास आळा घालण्यें भाग आहे; आणि वर सांगितलेल्या निरनिराळ्या चालीमुळें जे अयथामार्ग प्रचलित आहेत, ते बंद करणें इष्ट आहे; त्यापेक्षां त्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे.

उद्देश

## नियमांची सुरुवात.

१ ह्या नियमांना "कोल्हापूरचे काडी मोडण्याचे नियम" असें ह्मणावें व ते तारीख २ आगस्ट १९१९ रोजीं अमलांत येतील.

नियमांची व्यप्ति.

२ हे नियम कोल्हापूर इलाख्यांतील सर्व भागास लागू आहेत; आणि सन १८६९ चा कायदा नंबर ४ आणि सन १८६५ चा पार्शी लोकांचा वैदाहिक कायदा नंबर १५ हे अनुक्रमें ज्यांना लागू आहेत असे ख्रिश्चन व पार्शी लोक खेरीजकरून श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब यांच्या सर्व प्रजाजनांना हा कायदा लागू आहे.

मुसलमान नवऱ्याला आपल्या बायकोला "तलाक" देण्याचा जो हक्क आहे, त्याला या नियमांतील कोणत्याहि गोष्टीनें बाध येणार नाहीं.

३ यथाविधि विवाह झाल्यापासून आपल्या बायकोनें जारकर्माचा अपराध केला अगर सयुक्तिक कारणाशिवाय २ वर्षें अगर त्याहून जास्त आपला परित्याग केल्याचा अपराध केला ह्या सबबीवर आपणाला काडी मोडून मिळावी; ह्मणून ज्या सबार्डिनेट जज्जाच्या कोर्टाच्या स्थलसीमेंत तो रहात असेल त्या कोर्टाकडे कोणत्याहि नवऱ्यानें अर्ज करावा.

नवऱ्यानें काडी मोडण्याकरितां केव्हां अर्ज करावा.

४ यथाविधि विवाह झाल्यापासून आपल्या नवऱ्यानें स्वतः अगर दुसरे कोणत्याहि इसमास प्रवृत्त करून अगर परवानगी देऊन इं० पि० कोड कलम ३२० मध्यें दिलेल्या व्याख्येप्रमाणें जबर दुखापतीचा गुन्हा केला आहे.

बायकोनें काडी मोडण्याकरितां केव्हां अर्ज करावा.

अगर आपल्या नवऱ्यास महारोग झाल्याचें आढळून आलें आहे,

अगर आपला नवरा वेडा अगर नपुंसक आहे, असें शाबीद झालें आहे,

अगर सयुक्तिक कारणाशिवाय दोन वर्षें अगर त्याहून जास्त आपला परित्याग करण्याचा अपराध आपल्या नवऱ्यानें केला आहे, अथवा दोन वर्षें अथवा त्याहून जास्त आपल्या नवऱ्यानें आपल्यास एकशय्या करून दिली नाहीं, ह्या सबबीवर आपणास काडी मोडून मिळावी ह्मणून; ज्या सबॉर्डिनेट जज्जाच्या स्थलसीमेंत आपला नवरा स्वतः रहात असेल, व्यापार करीत असेल, अगर फायद्याकरितां काम करींत असेल त्या कोर्टाकडे कोणत्याहि बायकोनें अर्ज करावा. ह्या नियमापुरता जबर दुखापतींत डाग देण्याचा अंतर्भाव होतो.

काडी मोडून घेण्याचा हक्क ज्या कारणांवरून प्राप्त होतो त्या सर्व गोष्टी कामाच्या स्वरूपाप्रमाणें जितक्या स्पष्टपणें देतां येतील तितक्या, अशा प्रत्येक अर्जांत दिल्या पाहिजेत.

५ काडी मोडून घेण्याकरितां असा कोणताही अर्ज आला असतां (अर्जांत) नमूद केलेल्या गोष्टीसंबधानेंच शक्य तितक्या योग्यतऱ्हेनें कोर्टानें आपली खात्री करून घ्यावी, इतकेंच नव्हे, तर जारकर्मांत अगर परित्यागांत अर्जदार कोणत्याही तऱ्हेनें सहाय्यभूत झाला किंवा नाहीं अगर त्यानें तिकडे कानाडोळा केला किंवा नाहीं, अथवा त्या त्यानें मान्य केल्या किंवा नाहीं, याबद्दल योग्यतऱ्हेनें कोर्टानें आपली खात्री करून घ्यावी; आणि अर्जदाराविरुद्ध कोणताही उलट आरोप करतां येत असल्यास त्याबद्दलचीही चौकशी करावी.

संगनमत केलें नसल्याबद्दल कोर्टाची खात्री होणें.

६ अर्जदाराचें ह्मणणें अर्जदाराचे पुराव्यावरून शाबीद झालें नाहीं, अशी कोर्टाची खात्री झाल्यास अगर अर्जदारानें नमूद केलेलें जारकर्म अथवा ज्या योगानें अर्जदारास डिक्री मिळवितां येईल, अशा दुसऱ्या गोष्टी अगर क्रूरपणा झालेला नाहीं, अशी कोर्टाची खात्री होत नसेल तर:—

अर्ज काढून टाकणें.

अगर ज्याच्याशीं विवाह झाला आहे, अशा प्रतिपक्षाच्या जारकर्मांत अर्जदार हा वैवाहिकसंबंध कायम असतांना सहाय्यभूत झाला अगर ज्या जारकर्माबद्दल तो तक्रार करतो तें त्यानें मान्य केलें आहे, असें कोर्टास आढळून येईल; तर

आणि उपरीनिर्दिष्ट कोणत्याही प्रसंगीं कोर्टानें तो अर्ज काढून टाकावा.

७. अर्जदाराची केस पुराव्यावरून शाबीत झाली आहे, अशी कोर्टाची खात्री होईल तर, आणि ज्याच्याशीं विवाह झाला आहे, अशा प्रतिपक्षाच्या जारकर्मांत अर्जदार हा कोणत्याही तऱ्हेनें सहाय्यभूत झाला नाहीं, अगर त्यानें तिकडे कानाडोळा केला नाहीं, अगर ज्या जारकर्माबद्दल अगर परित्यागाबद्दल तक्रार चालू आहे, तें जारकर्म अगर तो परित्याग त्यानें मान्य केला, असें पुराव्यानें शाबीद होणार नाहीं, तर काडी मोडलेली आहे असें दर्शविणारी कोर्टानें डिक्री द्यावी.

काडी मोडून देण्याचा हुकूमनामा देण्याचा कोर्टाचा अधिकार.

तथापि अर्जदारानें वैवाहिकसंबंध कायम असतांना जारकर्माचा गुन्हा केला आहे;

अगर असा अर्ज करून गुदरण्यांत अर्जदारानें मर्यादेबाहेर उशीर केल्याचा दोष केला असें कोर्टास वाटल्यास;

अगर ज्याच्याशीं विवाह झाला आहे, त्या प्रतिपक्षाशीं क्रूरपणा केला आहे, असें कोर्टास वाटल्यास,

अगर ज्या जारकर्माबद्दल तक्रार आहे, तें घडण्यापूर्वी आणि योग्य कारणाशिवाय प्रतिपक्षाचा स्वतः तिनें अगर त्यानें परित्याग केला आहे, अगर जाणूनबुजून विभक्त झाला आहे, अगर झाली आहे, असें कोर्टास वाटल्यास,

अगर जारकर्माला कारणीभूत होईल असा प्रतिपक्षाशीं अगर प्रतिपक्षाचा जाणूनबुजून केलेला हलगर्जीपणा अगर गैरशिस्त वर्तन असेल तर;

अगर कोर्टाला योग्य वाटेल त्या दुसऱ्या कारणाकरितां;

अशी डिक्री देण्यास कोर्ट बांधलें गेलें नाही.

मान्यता. वैवाहिक एकशय्यासन पुन्हां सुरू केल्याशिवाय अगर चालू ठेविल्याशिवाय कोणतेंही जारकर्म मान्य केलें असें या नियमाधारें समजलें जाणार नाहीं.

८ जेव्हां नवरा अगर बायको योग्य कारणाशिवाय परस्पराची संगत सोडील तेव्हां वैवाहिक हक्क प्रस्थापित करण्याकरितां बायकोनें अगर नवऱ्यानें सबार्डिनेट जजाच्या कोर्टाकडे अर्ज करावा; आणि अशा अर्जांत दिलेली माहिती खरी आहे, आणि तो अर्ज कां नामंजूर करावा यास कायदेशीर कारणें नाहींत अशी कोर्टाची खात्री झाल्यास कोर्टानें त्याप्रमाणें वैवाहिक हक्क प्रस्थापित करण्याचा हुकूमनामा द्यावा.

९ काडी मोडून मिळण्याच्या अर्जाला जी अधार होणार नाहीं अशी कोणतीही गोष्ट वैवाहिक हक्क प्रस्थापित करून मिळण्याच्या अर्जाला उत्तर ह्मणून तक्रारींत मांडतां येणार नाहीं.

## विवाह रद्द करणें.

१० विवाह रद्द करणें. ज्या वेळीं विवाह झाला त्या वेळीं आपला पूर्वीचा नवरा हयात होता व अशा पूर्वीच्या नवऱ्याशीं झालेला विवाहसंबंध त्या वेळीं कायम होता या सबबीवर कोल्हापूर इलाख्यांत विरुद्ध पक्षकारांशीं झालेला आपला विवाह रद्द व बातल आहे, असें ठरवून मिळण्याकरितां कोणाही नवऱ्यानें सबजजाचे कोर्टांत अर्ज करावा.

विवाह रद्द होण्याचा हुकूमनामा. वर सांगितलेल्या कारणाकरितां जेव्हां एखादा विवाह रद्द होईल आणि पूर्वीचा नवरा मयत होता अशा पूर्ण विश्वासानें व इमानानें दुसरा विवाह झाला होता असा कोर्ट ठराव देईल तेव्हां हुकूमनामा देण्यापूर्वी झालेलीं मुलें हुकूमनाम्यांत नमूद केलीं जातील व तीं आपल्या आईची इस्टेट मिळण्यास पात्र होतील; आणि वैवाहिक संबंधापासून झालेल्या

संततीच्या ते अज्ञान असे तोंपर्यंतच्या पोषणाकरितां व शिक्षणाकरितां, त्यांच्या बापाच्या इस्टेटींतून तजवीज करण्याचा कोर्ट हुकूम देईल.

हे नियम अमलांत आल्यानंतर जे विवाह होतील त्यांसच हा नियम लागू होईल.

## नुकसानी व खर्च.

जारकर्म करणाऱ्या मनुष्यापासून नवऱ्यानें नुकसानी मागावी.

११. अर्जदाराचे बायकोबरोबर त्यानें जारकर्म केलें आहे, ह्या सबबीवर कोणाही मनुष्यापासून नुकसानभरपाई होऊन मिळण्याबद्दल कोणाही नवऱ्यानें विवाह रद्द करून मिळण्याच्या अर्जामध्यें मागणी करावी.

बजावणी करूं नये असें कोर्टास न वाटल्यास अगर ह्या जागीं दुसरी एखादी बजावणी करण्याचा कोर्ट हुकूम न देईल तर जारावर व बायकोवर अशा अर्जाच्या नोटिशीची बजावणी केली जाईल.

जरी विरुद्ध पक्षकार अगर त्यांपैकीं कोणीही हजर राहणार नाहीं तरीही अशा अर्जांत किती नुकसानी द्यावी हें सदर कोर्टानें ठरवावें.

मुसलमान बायकोनें अर्ज केला असेल त्या वेळीं मेहर असेल तर मेहेरचा किती भाग नवऱ्यानें बायकोस द्यावा हें कोर्ट ठरवील.

खर्च देण्याबद्दल जारास हुकूम करण्याचा अधिकार.

१२. नवऱ्यानें केलेल्या कोणत्याही अर्जामध्यें जेव्हां जारास विरुद्ध पक्षकारांत सामील केलें जातें व जारकर्म शाबीत होतें, त्यावेळीं काम चालविण्याकरितां झालेला सर्व खर्च अगर त्याचा कोणताही भाग जारानें देण्याचा हुकूम कोर्टानें करावा.

(अ) जर जारकर्म झाल्या वेळीं बायको नवऱ्यापासून निराळी रहात असेल व कसबिणीचा धंदा करीत असेल, अगर

(ब) जर जारकर्म झाल्या वेळीं ती बायको विवाहित स्त्री आहे, असें समजण्यास जारास आधार नसेल, तर अर्जदाराचा खर्च देण्याचा जारास हुकूम केला जाणार नाहीं.

काम चालू असतांना अन्नवस्त्र खर्च.

१३. ह्या नियमाप्रमाणें चाललेल्या कोणत्याही कामांत, मग तें नवऱ्यानें अगर बायकोनें चालविलेलें असो, अर्जाचा निकाल होईपर्यंतचा अन्नवस्त्र खर्च मिळण्याबद्दल बायकोनें अर्ज करावा.

अशा अर्जाच्या नोटिशीची नवऱ्यावर अंमलबजावणी केली जाईल व त्या अर्जांतील माहिती खरी आहे अशी कोर्टाची खात्री झाल्यास, काम चालू असतांना, कोर्टास न्याय्य वाटेल तो अन्नवस्त्र खर्च नवऱ्यानें बायकोस देण्याचा हुकूम कोर्टानें करावा.

तथापि काम चालू असतां जो अन्नवस्त्र खर्च द्यावयाचा तो, हुकूम देण्याच्या तारखेच्या अगदीं अगोदरच्या तीन वर्षांतील नवऱ्याच्या सर्वसाधारण नक्त प्राप्तीच्या एकपंचमांशपेक्षां केव्हांही जास्त असणार नाहीं; आणि काडी मोडण्याचा हुकूमनामा अखेर कायम होईपर्यंत सदरचा अन्नवस्त्र खर्च चालू राहील.

कायमचा अन्नवस्त्र खर्च देण्याचा हुकूम देण्याचा अधिकार.

१४. काडी मोडून देतेवेळीं, बायकोची धनदौलत असेल तर त्याचा, नवऱ्याच्या बुद्धिमत्तेचा आणि पक्षकारांच्या वर्तनाचा विचार करून जी वार्षिक रकम अगर एकटांत एक रकम, कोर्टास योग्य वाटेल ती, बायकोकरितां, तिच्या हयातीपेक्षां जास्त नाहीं इतक्या कितीही मुदतीपर्यंत, कोर्टाच्या मर्जीप्रमाणें राखून ठेवण्याचा कोर्टानें नवऱ्यास हुकूम करावा; आणि ह्या कारणाकरितां जरूर त्या पक्षकारांस योग्य दस्तऐवज करून द्यावयास लावावा. जर बायको पुनर्विवाह करील अगर जर तिनें जारकर्माचा

अपराध केल्याचें शाबीत होईल तर असला अन्नवस्त्र खर्च तिला मिळ-ण्याचें बंद होईल.

१५ अन्नवस्त्र खर्च देण्याबद्दल जेव्हां जेव्हां कोर्ट हुकूमनामा अगर हुकूम देईल त्या त्या सर्व वेळीं तो खुद्द बायकोस अगर कोर्टानें पसत केलेल्या तिच्या तर्फेच्या कोणाही ट्रस्टीस देण्याचा कोर्टानें हुकूम करावा; व कोर्टाला ज्या योग्य वाटतील अशा कोणत्याही अटी अगर प्रतिबंध कोर्टानें घालावेत; आणि कोर्टास योग्य वाटल्यास वेळोवेळीं नवीन ट्रस्टीची नेमणूक करावी.

अन्नवस्त्र खर्च बायकोला अगर तिच्या ट्रस्टीला देण्याचा कोर्टानें हुकूम करावा.

१६. बायकोनें जारकर्म केलें आहे ह्मणून जेव्हां जेव्हां कोर्ट काडी मोडून देण्याचा हुकूमनामा देते, तेव्हां तेव्हां बायकोचा कोणत्याही मालमत्तेवर अधिकार आहे असें कोर्टाला आढळून येईल तर सदरहू मालमत्ता अगर तिचा कितीही भाग; जो कोर्टाला योग्य वाटेल तो, नवऱ्याच्या अगर वैवाहिक संततीच्या अगर दोघांच्या फायद्याकरितां कोर्टास योग्य वाटल्यास कोर्टानें लावून देण्याचा हुकूम द्यावा.

नवऱ्याच्या व मुलांच्या फायद्याकरितां बायकोची इस्टेट लावून हुकूम देण्याचा अधिकार.

काडी मोडून देण्याचा हुकूमनामा देण्याच्या वेळीं अगर त्यानंतर, जो कोणताही दस्तऐवज कोर्टाचे हुकुमानें करून दिला असेल तो, सदरहू दस्तऐवज करून देतेवेळीं वैवाहिक संबंधामुळें येणाऱ्या नालायकीस न जुमानतां कायदेशीर समजला जाईल.

१७. या नियमाअन्वयें जें नुकसान मिळेल तें सर्व अगर त्यापैकीं कितीही भाग, वैवाहिक संतति जर असेल तर तिच्या फायद्याकरितां, अगर बायकोच्या पोटगीकरितां राखून ठेविलेली ह्मणून काढून ठेविलेल्या आहे. असा कोर्टानें हुकूम द्यावा.

नुकसानी ठरविणे.

जेव्हां नवऱ्याकडून अगर बायकोकडून काडी मोडून मिळण्याबद्दल अर्ज दिला जातो तेव्हां ज्याच्या आईबापाच्या विवाहाबद्दल दावा चालू आहे अशा अज्ञान मुलांच्या अगर मुलीच्या ताब्याबद्दल, पोटगीबद्दल, आणि शिक्षणाबद्दल कोर्टानें तात्पुरता हुकूम द्यावा, अगर पक्का हुकूमनामा देतेवेळीं हुकूम द्यावा; आणि कोर्टास योग्य वाटेल तर सदरहू मूल अगर मुलें कोर्टाच्या आश्रयाखालीं घेण्याकरितां काम चालविण्याबद्दल कोर्टानें हुकूम द्यावा.

## काम चालविण्याची पद्धत.

वेडे अगर अज्ञान यांचे तर्फेचे दावे.

१८. जेव्हां अर्जदार अगर विरुद्ध पक्षकार वेडा अगर अज्ञान असेल त्यावेळीं त्याचें अज्ञानपालन करणाऱ्याबद्दल सिव्हिल प्रोसिजर कोडमध्यें जी पद्धत सांगितली आहे ती अनुसरली जाईल.

समन्सांची वगैरे बजावणी.

१९. पक्षकारावर व साक्षीदारावर समन्साची बजावणी करण्याकरितां सिव्हिल प्रोसिजर कोडमध्यें जे नियम दिले आहेत ते अनुसरले जातील.

पुरावा घेण्याची पद्धत.

२०. ज्यांना कोर्टांत हजर रहातां येणें शक्य आहे अशा कोर्टापुढें चाललेल्या सर्व कामांतील साक्षीदारांची तोंडी जबानी घेतली जाईल; आणि कोणाही पक्षकारानें साक्षीदार म्हणून स्वतः पुढें यावें; आणि दुसऱ्या एकाद्या साक्षीदाराप्रमाणें तिची अगर त्याची साक्ष घेतली जाईल; आणि उलट तपासणी होईल व फेरतपासणी होईल.

तथापि प्रतिज्ञालेखाच्या द्वारें आपआपल्या केसीचें पूर्णपणें अगर अंशतः समर्थन करण्याची पक्षकारास मुभा राहील; परंतु उलट पक्षकाराच्या अर्जावरून अगर कोर्टाचे हुकमावरून असा प्रतिज्ञालेख करणारा प्रत्येक मनुष्य, उलट पक्षाच्या तर्फेनें अगर उलटपक्षाकडून, तोंडी

उलट तपासणी करण्यास पात्र होईल; आणि अशा उलट तपासणीनंतर, ज्याचेकडून असा प्रतिज्ञालेख कोर्टांत दाखल केला गेला असेल त्या पक्षाच्या तर्फेनें अगर त्याचेकडून, वर सांगितल्याप्रमाणें तोंडी फेरतपासणी करण्यास तो पात्र होईल.

क्रूरपणा अगर परित्याग केल्याचा पुरावा देण्याची नवराबायकोची पात्रता.

२१. आपल्या नवऱ्यानें क्रूरपणाचा अपराध केला आहे, अगर सयुक्तिक कारणाशिवाय परित्याग करण्याचा अपराध केला आहे, अगर वैवाहिक पत्नी म्हणून आपणास न राहूं देण्याचा आपल्या नवऱ्यानें अपराध केला आहे, या सबबींवर जेव्हां एखादी बायको आपणास काडी मोडून मिळावी म्हणून अर्ज करील तेव्हां सदरहू क्रूरपणा अगर परित्याग इत्यादिक यांचा अगर याविषयींचा पुरावा देण्यास नवरा व बायको हे अनुक्रमें पात्र आहेत; व त्यांनीं तो तसा देणें भाग आहे.

दरवाजे बंद करणेचा अधिकार.

२२ या नियमानुसार चाललेलें काम सर्वस्वी अगर अंशतः कोर्टास योग्य वाटल्यास दरवाजे बंद करून ऐकून घेतां येईल.

तहकुबीचा अधिकार.

२३ कोणत्याही अर्जावरून चाललेल्या कामांत कोर्टानें वेळोवेळीं तहकुबी द्यावी आणि या नियमान्वयें त्यासंबंधानें कोर्टास योग्य वाटल्यास जास्त पुरावा कोर्टानें मागवावा.

हुकुमाची व हुकूमनाम्याची बजावणी व त्यावरील अपिलें.

२४ ज्याप्रमाणें ओरिजिनल सिव्हिल ज्युरिसडिक्शनच्या आधारें कोर्टाचे हुकुमाची आणि हुकूमनाम्याची बजावणी केली जाते; आणि ज्याप्रमाणें त्या वेळीं चालू असलेले कायदे, नियम अगर हुकूम या अन्वयें अपिलें होतात, त्याचप्रमाणें या नियमान्वयें चाललेल्या कामांत कोर्टानें जे हुकूमनामे व हुकूम दिले असतील त्यांत अंमलबजावणी होईल व अपिलें होतील.

कोर्टखर्चाबद्दल अपील नाहीं. : तथापि केवळ कोर्टखर्चाकरितांच अपील होणार नाहीं.

२५ काम चालू असतां कोणत्याही वेळीं अर्जदार व विरुद्ध पक्षकार यांनीं परस्परांच्या संमतीनें काडी मोडून मिळण्याकरितां अर्ज करावा; आणि कोर्टास योग्य वाटल्यास आणि जर वैवाहिक संतति असेल तर, अशा अर्जांतील शर्तींप्रमाणें कोर्टानें संमतीचा हुकूमनामा करावा.

संमतीचा हुकूमनामा.

२६ नवरा व बायको यांना काडी मोडल्याबद्दलचा आपसांत करार करणेस या नियमावरून कोणत्याही तऱ्हेनें बाध येणार नाहीं. अशा रीतीनें काडी मोडल्याचें झालेलें करारपत्र कोर्टांत हजर केलें पाहिजे; आणि वैवाहिक संतति असेल तर त्यांच्या पोटगीची व शिक्षणाची योग्य तजवीज झाली आहे, अशी कोर्टाची खात्री झाल्यास असलें करारपत्र कोर्ट मंजूर करील, आणि असलें करारपत्र मंजूरीनंतर नोंदले पाहिजे.

अशारीतीनें नोंदल्यानंतर १ महिन्यानें काडी मोडल्याचा अम्मल होणेचा आहे.

२७ ह्या नियमांना ज्यांच्या योगानें कोणत्याही तऱ्हेनें अडथळा येतो, अगर प्रतिबंध येतो आणि ज्यांचा विदिक्षित तऱ्हेनें अंतर्भाव केलेला नाहीं, अशा सर्व चाली व रीती ह्या नियमान्वयें बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या आहेत.

२८ श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब यांना वेळोवेळीं योग्य वाटतील ते या नियमाखालीं पोट नियम करण्याचा अधिकार आहे; व वेळोवेळीं त्यांत फेरबदल करण्याचा आणि नवीन नियम करण्याचा अधिकार आहे.

तथापि अशा रीतीचे पोटनियम फेरफार व जादा नियम, या नियमांच्या कलमांना व सिव्हिल प्रोसिजर कोडला सुसंबद्ध असावेत.

अशा रीतीनें केलेले सर्व पोटनियम, फेरफार अगर जादा नियम कोल्हापूर स्टेट ग्याझिटमध्यें प्रसिद्ध करण्यांत येतील.

३

ग्याझिट पान ३९ तारीख २-८-१९

# स्त्रियांना क्रूरपणानें वागविणेचें नाहींसें करावें किंवा त्यांस प्रतिबंध करावा ह्मणून केलेले नियम.

## भाग १.

### प्रस्तावना.

नियम करणेचे उद्देश:—इं० पी० कोडमध्यें ज्यासंबंधीं सांगितलेलें नाहीं, अशा प्रसंगीं स्त्रियांना क्रूरपणानें वागविण्याबद्दल शिक्षा करण्याबाबत कायदा करणें योग्य आहे, असें दिसून आल्यावरून खालीलप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे.

स्त्रियांना क्रूरपणानें वागविणेचें नाहींसें करावें किंवा त्यास प्रतिबंध करावा ह्मणून केलेले नियम.

१ कायद्याचें नांव, आरंभ आणि त्याची व्याप्ति.

या नियमांना "स्त्रियांना क्रूरपणानें वागविण्याचें बंद करण्याबद्दल नियम" असें नांव दिलें आहे; आणि तारीख २ आगष्ट सन १९१९ पासून ते अमलांत येतील. हे नियम करवीर संस्थानांतील सर्व हिंदी प्रजेस लागू होतील; आणि रेसिडेंट साहेबांनीं मंजूर केल्यास ते फ्युडेटरी जहागिरींनाहि लागू होतील

२ शब्दांच्या अर्थाचें कलम :—विषयास अगर पूर्वापार संबंधास बाध येत नसेल तर, या नियमामध्यें पुढील शब्दांचा अर्थ पुढें लिहिल्याप्रमाणें करणेचा आहे. म्हणजे:—

(अ) "क्रूरपणाची वागणूक" म्हणजे, जिच्या योगानें अयोग्य प्रकारची अनवश्यक शारीरिक दुःख अगर पीडा उत्पन्न होते, अगर जिच्या योगानें प्रकृतीस इजा होणेसारखे मानसिक क्लेश होतात, अगर जिच्या योगानें प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होण्यासारखी, योग्य भीति उत्पन्न होते, ती वागणूक.

(ब) "तो" हें सर्वनाम आणि विभक्ति लागून झालेले शब्द हे पुरुष अगर स्त्री कोणत्याही मनुष्याच्या अर्थानें योजिलेले आहेत.

(क) एकवचनाच्या शब्दांत बहुवचनाचा समावेश होतो; आणि बहुवचनामध्यें एकवचनाचा समावेश होते

(ड) "समजुतीचें वय" ह्मणजे १६ वर्षें.

(ई) या नियमांत योजिलेले शब्द ज्यांची या कायद्यामध्यें व्याख्या केलेली नाहीं, परंतु इं० पी० कोड व क्रि० प्रो० कोड यांत व्याख्या केलेली आहे, त्या शब्दांचे अर्थ त्या त्या कोडांत सांगितलेप्रमाणें आहेत असें समजावें.

---

## बाब २ री.

### साधारण अपवाद.

इं० पी० कोडाचीं कलमें ७६ ते १०६ (दोन्ही धरून) यांचा समावेश या नियमांत केलेला आहे; व तीं कलमें या कायद्यांत प्रत्यक्ष घातल्याप्रमाणें त्यांचा परिणाम समजणेंचा आहे.

# बाब ३ री.

## या नियमाखालील अपराध.

४ जो कोणी समजुतीचे वयांत आलेला असून पूर्वीचे व्याख्येंत सांगितल्याप्रमाणें कोणाही स्त्रीशीं आपखुशीनें क्रूरपणाची वागणूक करील तर त्यास दोहोंप्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे; आणि ती कैद सहा महिनेपर्यंत ठरविणेचा अखत्यार आहे, किंवा त्यास दंडाचीही शिक्षा दिली पाहिजे; आणि तो दंड २०० रुपयेपर्यंत करणेचा अखत्यार आहे; किंवा दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत; आणि असेंही ठरविण्यांत येतें कीं, ज्या स्त्रीस क्रूरपणानें वागविलें ती स्त्री समजुतीचे वयांत आली नसेल तर ती शिक्षा दुप्पट करण्याचा अखत्यार आहे.

खुलासाः—कैद दोन प्रकारची आहे.

१ सक्त मजुरीची.

२ साधी.

### उदाहरणें.

अ. आपली बायको राहात असलेल्या आपल्या घरीं अ हा आपखुषीनें एका रखाऊ स्त्रीस आणतो, आणि आपल्या स्त्रीच्या इच्छेविरुद्ध आणि ती नको ह्मणत असतां, त्या रखाऊ स्त्रीस त्या घरीं ठेवतो; आणि त्यायोगें आपल्या स्त्रीच्या प्रकृतीवर शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होईल अशी योग्य भीति उत्पन्न करतो.

अ हा या नियमान्वयें अपराध केलेबद्दल गुन्हेगार आहे.

ब. अ चे धाकटे भावाची एक विधवा आहे. तो त्याच्या कुटुंबापैकीं एक इसम आहे. तिला आपले ताब्यांत ठेवणे-

साठीं अ हा सतत दोन दिवस आणि दोन रात्रीं तिला मुद्दाम अन्नपाण्यावांचून ठेवतो किंवा तिला झोंप लागू न देतां उभी करतो.

अ हा या कायद्याप्रमाणें गुन्हेगार आहे.

क. अ हा मुद्दाम बरेच दिवस आपल्या स्त्रीचा सहवास टाळतो किंवा तिची मुद्दाम अवहेलना करतो; आणि अशा टाळण्यानें आणि अवहेलनेनें तिच्या प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होणेची योग्य भीति तो उत्पन्न करतो.

अ हा या नियमाप्रमाणें अपराध केल्याप्रमाणें गुन्हेगार आहे.

ड. अ ही आपल्या सुनेस मुद्दाम अत्यंत उपमर्दक भाषा वापरून, किंवा तिजवर थुंकून किंवा तिला रस्त्यावरून ओढून चारचौघांत तिच्या मनाला धक्का देते; आणि त्यायोगें तिच्या प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होण्यास योग्य अशी भीति उत्पन्न करते.

अ ही या नियमान्वयें अपराध केलेबद्दल गुन्हेगार आहे.

ई. ब ही अची सावत्र आई आहे; आणि ती अवर अवलंबून आहे. तिच्या मनास दुःख व्हावें म्हणून तिच्या समक्ष बुद्धिपुरःसर अ हा तिचे मुलांना वाईटरीतीनें वागवितो; आणि असें करून ब च्या प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होणेसारखी भीति उत्पन्न करितो.

अ हा या नियमान्वयें अपराध केल्याबद्दल गुन्हेगार आहे.

फ. अ हा आपल्या स्त्रीची, तिच्या पातिव्रत्यासंबंधीं वारंवार आणि निराधार दूषणें देऊन, बेआदबी करितो; आणि त्या कारणावरून, तिच्याकडे दुर्लक्ष करून, आणि तिला

अर्धपोटीं ठेवून, तिला इतक्या जुलुमानें वागवितो कीं, तिला वेड लागण्यासारखी भीति उत्पन्न होते.

अ हा या नियमान्वयें गुन्हेगार आहे.

५ वरील शेवटचे नियमान्वयें अपराध केल्याबद्दल एखाद्या इसमास शिक्षा झाली; आणि त्याच नियमाखालीं अपराध केल्याबद्दल पुन्हां तो गुन्हेगार ठरला तर त्यास दोहों प्रकारांपैकीं कोणत्याही एकाप्रकारचे कैदेची शिक्षा द्यावी; आणि ती दोन वर्षेपर्यंत देणेचा अखत्यार आहे; शिवाय तो दंडासही पात्र होईल.

अ. या नियमान्वयें अपराध केल्याबद्दल कोणा इसमाचा तपास अगर चौकशी चालू आहे, असें असतां, त्याच इसमाविरुद्ध वरील नियमाखालीं पुन्हां त्या इसमानें अपराध केला असेल तर, त्या दुसऱ्या गुन्ह्याबद्दलची चौकशी चालू चौकशीचे वेळींच होईल; आणि त्यावर गुन्हा शाबीद झाल्यास तो जास्त शिक्षेस पात्र होईल.

ब. या नियमान्वयें तपास अगर चौकशी चालू असतां त्यांतील फिर्यादी आरोपीचे अंगावर चालून जाईल अगर त्याचा उपमर्द करील, तर तें अंगावर जाणें, अगर उपमर्द करणें, शाबीत झाल्यास, निकाल सांगणेच्या पूर्वी, केव्हांही फिर्यादीची फिर्याद काढून टाकण्यास पात्र होईल फिर्याद काढून टाकण्यास अंगावर जाणें व उपमर्द करणें, कोणत्याप्रकारचें पाहिजे, हें ठरवणें केवळ मूळ अपराधाचा तपास अगर चौकशी करणाऱ्या कोर्टाचे मर्जीवर आहे.

६ साह्य करण्यासंबंधीं इं० पी० कोडमध्यें जीं कलमें व त्यांच्या व्याख्या आहेत, तीं सर्व कलमें या कायद्याखालील अपराधांचें साह्यास लागू आहेत.

## बाब ४ थी.

७ या कायद्याखालील सर्व गुन्ह्यांची चौकशी सेशन कोर्ट अगर १ ला अगर २ रा वर्ग माजिस्ट्रेट यांनीं करावी; आणि ती प्रचलित क्रि० प्रो० कोडप्रमाणें करावी.

८ एखाद्या स्त्रीसंबंधानें जी वागणूक झाली असें ह्मणणें असेल, ती वागणूक, इं० पी० कोडप्रमाणें अपराध होईल, किंवा या कायद्याप्रमाणें अपराध होईल, याजबद्दल शंका येईल त्या प्रसंगीं, आरोपीवर वैकल्पिक चार्ज करावा, परंतु इं० पी० कोडप्रमाणें त्या अपराधास जी शिक्षा सांगितली आहे त्यापेक्षां जास्त शिक्षेस तो पात्र होणार नाहीं.

९ या कायद्याखालील प्रत्येक अपराध हा नॉन कॉग्निजिबल् आहे, जामिनाचा आहे, व तो आपसांत भागवतां येईल.

१० एखादे कज्जांतील अखेरचा निकाल होणेंपूर्वी, यापुढें आपण फिर्यादीस क्रूरपणानें वागणार नाहीं, असें जर आरोपी कबूल करील, तर कोर्टांनीं ती फिर्याद निकालांत टाकावी; आणि मर्जीस येईल तर, ५० रुपयेपेक्षां जास्त नाहीं, अशी योग्य ती रक्कम त्या स्त्रीस आरोपीकडून देवविणेंबद्दल हुकूम करावा.

११ या कायद्याचे धोरणास विरुद्ध नाहींत, अशारीतीनें चालू क्रि० प्रो० कोडाचीं कलमें लागू आहेत असें समजावें.

४

ग्याझेट तारीख १७-१-१९२०.

# हिंदू अनौरस संतति व जोगतिणीसंबंधीं कायदा.

जनक बापाच्या मिळकतीवरील हिंदू अनौरस संततीचा वारसा व हिस्सा यांसंबंधीं, आणि जोगतिणी व देवास अगर धर्माच्या नांवावर सोडलेल्या इतर मुली यांना पुरातन रूढीवरून मिळालेला दर्जा व त्या दर्जामुळें प्राप्त होणारे हक्क व कायदेशीर हितसंबंध रद्द करणारा, कायदा.

उद्देश. ज्यापेक्षां सामान्य नीतीचें संरक्षण करणें इष्ट आहे; आणि अमुक एक मनुष्य शूद्र आहे कीं नाहीं हें ठरविणें कठाण व त्रासाचें आहे तें दूर करणें इष्ट आहे; आणि जनक बापाच्या मिळकतीवरील वारसा व जन्मतःच प्राप्त होणारा हक्क हिंदू कायद्याअन्वयें शूद्रांच्या अनौरस संततीला निराळा, व वरिष्ठ तीन जातीं (द्विज) च्या अनौरस संततीला निराळा मिळतो, तो फरक काढून टाकणें जरूर आहे; आणि जोगतिणी व देवास अगर धर्माच्या नांवांवर सोडलेल्या इतर मुली यांना पुरातन रूढीवरून मिळणारे हक्क व कायदेशीर हितसंबंध रद्द करणें इष्ट आहे; आणि कोल्हापूर इला-ख्यांतील सर्व हिंदूंना यासंबंधीं लागू होणाऱ्या हिंदू कायद्याचें एकीकरण करून तो सर्वांना समसमान लागू करणें जरूर आहे; त्यापेक्षां याव-रून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे.

संज्ञा. या कायद्यास हिंदु वारशाच्या कायद्याच्या दुरु-स्तीचा कायदा ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति. हा कायदा सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे. आणि तो तारीख १७ जानेवारी सन १९२० इसवीपासून अम्मलांत येईल. आणि तो कोल्हापूर इलाख्यांतील सर्व हिंदु प्रजेला लागू आहे.

व्याख्या. या कायद्यांत हिंदुमध्यें जैन, लिंगायत, आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, वगैरे सुधारक धर्मियांचा, आणि वरिष्ठ वर्गांतील [द्विज] तिन्ही जातींचा व शूद्रांचा, समावेश होतो.

मागील नियमां-वरील परिणाम. हा कायदा कोल्हापूर इलाख्यांतील दिवाणी, फौजदारी, व मुलकी कोर्टांत या कायद्याच्या अम्मल तारखेस व अम्मल तारखेनंतर जे अव्वल व अपीलाचे कज्जे, तसेंच तपासणीचे अर्ज चालू असतील व चालू होतील त्या सर्व कज्जांना व अर्जांना लागू आहे. परंतु हा कायदा अमलांत येईल त्या तारखेस ज्या अनौरस मुलाचे वयास आठ वर्षें पूर्ण झाली असतील त्या मुलाचे हक्काला, व हा कायदा अमलांत येईल त्या तारखेच्या अगोदर ज्या जोगतीणीचे, अगर देवास अथवा धर्माचे नांवावर सोडलेल्या मुलीचे वयाला पूर्ण बारा वर्षें झाली असतील त्या मुलीचे हक्काला अगर कायदेशीर हितसंबंधाला या कायद्यानें कोणत्याहीप्रकारें बाध येणार नाहीं.

## कलम १ लें.

हा कायदा अम्मलांत येईल त्या तारखेपासून हिंदू कायद्यानें मान्य केलेल्या ज्या तत्वावर वरिष्ठ तीन जाती (द्विज)तील अनौरस संततीला वारसा व हिस्सा मिळतो, त्याच तत्वांवर हिंदु आईबापापासून जन्मलेल्या अनौरस संततीला, मग त्या संततीचा बाप अगर आई ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अगर दुसऱ्या कोणत्याही जातींतील असो, जनक बापाच्या मिळकतीवर वारसा व हिस्सा मिळेल. आणि कोल्हापूर इलाख्यांत राहाणाऱ्या हिंदूहिंदूमध्यें या बाबतींत यापुढें कसलाही फरक केला जाणार नाहीं.

## कलम २ रें.

जोगतीण, मुरळी, देवदासी, भावीण आदिकरून देवाला अगर देवस्थांत सोडलेल्या, अथवा धर्माच्या नांवावर अन्य तऱ्हेनें सोड-

लेल्या, कोणत्याही स्त्रीला, तिला अशारीरतीनें सोडलें नसतांना तिच्या जनक घराण्यांत जे हक्क प्राप्त झाले असते, तेच हक्क तिच्या जनक घराण्यांत प्राप्त होतील. आणि या कायद्याच्या अंमलतारखेनंतर, तिला वर सांगितल्याप्रमाणें सोडल्यामुळें जे वारसाचे व इतर विशिष्ट हक्क प्राप्त झाले असते, ते हक्क तिला प्राप्त होणार नाहींत; अगर वर सांगितल्याप्रमाणें सोडल्यामुळें तिला जो कायदेशीर दर्जा प्राप्त झाला असता तो तिचा दर्जाही मान्य केला जाणार नाहीं.

## परिशिष्ट १.

ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालेल्या हिंदू विवाहासंबंधीं कायद्यांतील कलम १६ मध्यें सांगितलेली फी दहा रुपयांपेक्षां अधिक नाहीं इतकी देणेची आहे.